(1)

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013) | February-2019
Special Issue 165 (B)- Multidisciplinary Issue
UGC Approved Journal

# जालना जिल्ह्यातील धार्मिक पर्यटन स्थळाचा एक भौगोलिक अभ्यास

डॉ. खान ए. आय.
भूगोल विभागप्रमुख,
शासकीय महाविद्यालय,
औरंगाबाद

लोंढे जिजा मुगाजी
संशोधक विद्यार्थीनी
डॉ.बा.आ.म.विद्यापीठ,
औरंगाबाद.

प्रस्तावनाः

जालना जिल्हा पर्यटन स्थळांच्या संख्येने व गुणवत्तेने समृध्द असा जिल्हा आहे. जिल्ह्याला समृध्द अशी ऐतिहासिक परंपरा आहे. जिल्ह्यातील एकुण पर्यटन स्थळांपैकी बहुतांश पर्यटन स्थळे ही धार्मिक पर्यटन स्थळे आहेत. या पर्यटन स्थळास विविध भागातून व परराज्यातून आलेले पर्यटन भेट देत असतात. या सर्व पर्यटन स्थळांपैकी दोन धार्मिक स्थळांचा अभ्यास या लेखात करण्यात आला आहे.

उद्देशः

जालना जिल्ह्यातील निवडक धार्मिक पर्यटन स्थळांचा अभ्यास करणे.

संशोधन पध्दतीः

सदरील संशोधन लेखासाठी जालना जिल्ह्यातील विविध धार्मिक पर्यटन स्थळांपैकी दोन (राजुर गणपती व मत्स्योदरी देवी अंबड) यांचा विस्तृत अभ्यास करण्यात आला आहे. यासाठी प्राथमिक व व्दितीय अशा दोन्ही प्रकारच्या माहितीचा स्त्रोत उपयोगात आणला आहे

धार्मिक स्थळाचें अध्ययनः

श्री क्षेत्र राजूरः

जालना शहरापासून 28 कि.मी. अंतरावर श्री क्षेत्र राजुर आहे. जालना मुख्यालयापासून राजूर येथे जाण्यास शासकीय बस व इतर खाजगी वाहने उपलब्ध होतात. या ठिकाणी गणपतीचे सुंदर मंदिर असून ते संगमवराने तयार केलेले आहे. प्रत्येक चतुर्थीला किमान 15000 पेक्षा जास्त भाविक दर्शनासाठी येतात तर मंगळवारी येणा-या चतुर्थीला (अंगारखी चतुर्थीला) 5,00,000 पर्यंत भाविक येतात. नवसाला पावणारा गणपती म्हणजे राजुरचा गणपती अशी ख्याती असल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातुन दर्शनासाठी येणा-यांची संख्या भरपूर आहे.त्याच बरोबर आजुबाजुच्या गावावरून येणारे लोक देखील आहेत.उदा.बुलढाणा, सिल्लोड, औरगाबाद , जालना, परभणी, मंठा, परतूर चिखली, धाड, दे.राजा. सिंदखेड, जाफ्राबाद, बदनापूर फुलंब्री, सोयगाव इ.दर अंगारखी चतुर्थी (मंगळवारी येणारी) यावेळेस या तिर्थ क्षेत्राला 20,00,000/- लाख रुपयापर्यंत दान होते.

दर महिण्याला येणा-या चतुर्थीला 800000/-रुपयापर्यंत दान होते या कारणामुळे श्री क्षेत्र राजूर मंदिराचा विकास झापाट्याने होत आहे. भक्त निवासाची व्यवस्था सुध्दा झालेली आहे.या बरोबर सामाजीक संस्था सुध्दा मंदिराच्या कामात हिररीने भग घेतात. शेगांव संस्थेच्या आधारावर मंदिराची व श्री गणपतीची विनामुल्य सेवा करतात.दर रविवारी या ठिकाणचा बाजार भरतो.बाजारला येणारा प्रत्येक व्यक्ती गणपतीचे दर्शन घेऊन जातो. महाराष्ट्रात गणपतीची साडेतीन पीठे आहेत. त्यात 'राजूर' हे पूर्णपीठ आहे.


राजूर या गावाची नोंद स्थानपोथीतील पृष्ठ 20 वर येते. या प्रमाणे या गावाच्या पश्चिमेस भिऊंडा अंबाचे देवळात चक्रधरस्वामी थांबत. हे देऊळ पुर्वमुखी असून पुर्वामुख दरवाजास उत्तराभिमुख खिडकी ठेवलेली आहे. महानुभव आजही गणपतीचे मंदिर व त्यालागत असलेल्या शिवमंदिरातील चौक नमस्कारी मानतात. राजूर येथे एक



Asst. Prof.
M.E.S.Class -I
Govt.College of Art's
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Scanned with OKEN Scanner

यादव कालीन ही एक एकमेव वास्तू आहे. एका ऊंच टेकाड्यावर असलेल्या जागेत गणेश, शिव व अन्य देवतांची मंदिरे असलेला तीन चार देवळांचा एक समुह असावा व यात मुख्य देऊळ हे महादेवाचे असावे. आज तेथील गणेश मंदिर हे प्रधान मानले जाते. या गणेशाचा महिमा पेशवे कालापासून सतत वाढत गेला असावा. पेशव्यांचे गुरु ब्रम्हेंद्र स्वामी हे मुळचे राजूरेचे राहणारे. पुढे ब्रम्हावृत्तातून त्यांनी या मंदिराच्या जिर्णोव्दारासाठी मदत गोळा करुन पाठवून दिल्याचा उल्लेख कागदोपत्री आढळतो.

गणेश मंदिराची रचना गर्मगृह त्यापुढील अंतराळ व सभागृह अशी असावी. आज यादवकालीन गाभारा कायम असून पुढील सभागृह नव्याने बांधण्यात आला आहे. त्याच्या लगत असलेले शिवमंदिर हे बरेच मोठे असून गर्भगृह पुढे अंतराळ व सभागृह याने युक्त होते. येथे अनेक देवतेच्या मंदिराचे अवशेष आहेत. येथे असलेली दिपमाळ अल्लाऊद्दीन खिलजीने पाडल्याची माहिती लोकरंपरेने सांगतात. याच मंदिराच्या परिसरात यादवकालीन मंदिराचे घटक, अवशेष विशेषतः स्तंभमध्य, स्तंभपाद, स्तंभशीर्ष तसेच व्दार शाखेचे अवशेष विखुरलेल्या स्थितीत पडलेले आहेत.



अखंड पेटलेली होती. जेंव्हा अल्लाऊद्दीन खिलजीने फोडली तेंव्हा तारांचे भेंडोळे सापडले, अखंड पेटलेल्या दिव्यामागे विज्ञान होते. दिवा विझला ही गोष्ट भक्तांना खटकली व त्यांनी अखंड पेटत्या समईतून ज्योत कायम ठेवली. आज शंभरापेक्षा अधिक समया रात्रंदिवस शांतपणे जळत असतात. याशिवाय अख्यायिकेप्रमाणे वरणेश्वराची मूर्तीही या मंदिराच्या कोपऱ्यात आहे.

**मत्स्योदरी देवी अंबडः**

मत्स्योदरी देवी अंबड हे पर्यटनस्थळ जालना जिल्ह्यातील अंबड शहरात असून ते जालना व बीड या दोन्ही जिल्ह्याच्या मधोमध आहे. याठिकाणी भक्तांच्या सोयी-सुविधेसाठी खास भक्तनिवासाची सोय करण्यात आली आहे. शासनाचा पर्यटन दर्जा यास असून अनेक खाजगी निवासाची सुविधाही येथे दिसून येतात. अंबड येथे मत्स्योदरी देवीचे भव्य मंदिर आहे. हे अंबड तालुक्याचे आराध्यदैवत आहे. अंबड येथील जगदंबेचे स्थान अशा पध्दतीचे आदिशक्तीचे पीठ, उपपीठ नाही तर या ठिकाणी त्रयस्वरुपी जगज्जननी ही केवळ भक्तांसाठी, त्यास आपले अखंड सान्निध्य लाभावे म्हणून प्रकट झालेली आहे. येथील स्थान माहात्म्य,भक्त माहात्म्य,जगदंबेचे भक्तसाधकांना निरनिराळया प्रसंगांमधून घडलेले अनुभूतीदर्शन,मंदिराचा निसर्गरम्य परिसर व मंदिराची भव्यता यामुळे हे स्थान केवळ वैशिष्ट्यपूर्णच नव्हे तर रमणीय व जगदंबेच्या चरणी दर्शनार्थीच्या मनात सहजपणे श्रध्दाभाव निर्माण करणारे आहे.

अंबड नगरीत प्रवेश करताच गावाच्या आग्रेय दिशेसस असलेल्या पर्वतावर विराजमान दगडी बांधकामाचे श्री मत्स्योदरी देवीचे भव्य मंदिर व आकाशलला गवसणी घालणारे उत्तुंग शिखर आपल्या नजरेत भरते.मंदिर परिसरात व पर्वतावर असलेल्या वृक्षराजाने मन सुखावते व रस्त्यावरील उभारलेल्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर प्रवेशद्वारातून मंदिर परिसरात प्रवेश करताच मंदिराच्या सुबक बांधलेल्यां 65 दगडी पायऱ्या व उभ्या असलेल्या दोन दीपमाळा भक्त भाविकांचे लक्ष वेधून घेतात. मंदिराच्या भव्य दरवाजा, त्यावर असलेली दगडी नगारखाना पाहताच भाविकास कधी मी मंदिरात जाऊन जगदंबेचे दर्शन घेईल अशी मनात असलेली स्वाभाविक इच्छा तीव्र होते व तो जगदंबेचे स्मरण करत



Asst. Prof.
M.E.S.Class -I
Govt.College of Art's
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Scanned with OKEN Scanner

मत्स्योदरी देवीचे स्थान हे अतिशय प्राचीन असून या स्थानाच्या निर्मितीसंबंधी कोणतीही निश्चित अशी माहिती उपलब्ध नसली तरी या देवीच्या माहात्म्यासंबंधी स्कंदपुराणातील सह्याद्री खंडात मत्स्योदरी माहात्म्य हा ग्रंथ उपलब्ध आहे. स्कंदपुराणाची रचना ही 2000 वर्षापेक्षा जूनी असल्यामुळे या मत्स्योदरी देवीच्या स्थानास हजारो वर्षाची परंपरा व इतिहास निश्चितपणे लाभलेला आहे.

मत्स्योदरी माहात्म्य या ग्रंथात देवी भक्त असलेले मार्कंडेय ऋषी आणि वैष्णवभक्त राजा अंबरीष यांचा संवाद ठिकठिकाणी आलेला आहे. अंबरीष राजा व मार्कंड ऋषीचा काळ लक्षात घेतला तर या मत्स्योदरी देवीच्या स्थानास निश्चितपणे हजारो वर्षाची परंपरा लाभल्याचे स्पष्टपणे दिसून येते. जगदंबेच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या या पर्वतावर देव देवता व भक्तगण तिच्या सहवासाची व सान्निध्याची सतत ओढ लागल्यामुळे अनुष्ठान व उपासनेसाठी सततपणे येथे वास्तव्य करीत असतात.त्यामुळे मत्स्योदरी देवीची व स्थानाची महती उत्तरोत्तर वाढतच चाललेली आहे. श्रध्देने उपासना करणा-या भक्तांना सहजपणे पावणारी श्री मत्स्योदरी देवी ही केवळ अंबड ग्रामवासियांची ग्रामदेवता राहिलेली नसून ती मराठवाड्यातील जनसामान्यांची श्रध्देची, उपासनेचे स्थान असलेली देवता झाली आहे.

श्री मत्स्योदरी देवीच्या नवरात्रोत्सव प्रतिवर्षी अश्विन शुध्द प्रतिपदा ते अश्विन दशमीपर्यंत अत्यंत उत्साहाने व श्रध्देने साजरा जातो. अश्विन शुध्द प्रतिपदेपूर्वी श्री मत्स्योदरीदेवी मंदिर आणि परिसराची विशेष स्वच्छता व रंगरंगोटी केली जाते.ठिकठिकाणी तोरणे व विजेच्या माळा लावून विद्युत रोषणाईची तयारी केली जाते. अश्विन शुध्द प्रतिपदेच्या दिवशी सकाळी गावातील सर्व ब्रहावृंदवर्ग मातेच्या सेवेसाठी मंदिरात हजर होतो. त्या ठिकाणी विश्वस्त मंडळाच्या अध्यक्षाच्या हस्ते धार्मिक विधी संपन्न झाल्यानंतर श्री महाकाली,महालक्ष्मी व महासरस्वती या तिन्ही देवतांची व मंदिरातील गणपती व शंकर आदी देवांची पूजा होवून विधीपूर्वक नवरात्राची घटस्थापना केली जाते.त्यानंतर अष्टमीपर्यंत होणा-या ग्रंथपठण पारायणादीची वर्णी ब्रह्वृंदास विश्वस्तत मंडळाच्या अध्यक्षाच्या हस्ते दिली जाते.यामध्ये सप्तशती, भवानी सहस्त्रनाम, विष्णू सहस्त्रनाम मत्स्योदरी महात्म्य यांचे पठण व नवार्ण मंत्र जप करणे ही धार्मिक कामे ब्रहावंदास दिली जातात यापेक्षाही वेगळे असे सेवा कार्ये अन्य भक्तांना दिली जातात त्यामध्ये मत्स्योद्री पर्वतास प्रदक्षिणा दैनंदिन अभिषेक, दुपारची व सायंकाळची आरती. यासाठी अनेक भक्तगण व ब्रह्वृंद हे सेवेमध्ये सहभागी होतात. दुपारी नैवेद्य आरतीनंतर सर्व भक्तगणांच्या प्रसादाची सोय संस्थान तर्फे तसेच भक्तगण पंक्ती कबूल करतात,त्याद्वारे केली जाते.या महोत्सव काळात दररोज दुपारी 3 ते 5 निरनिराळया महिला भजनी मंडळाची भजने तसेच देवी भागवतावरील प्रवचनाला कार्यक्रम होत असतो.रात्री आरती नंतर कीर्तन,प्रवचन,भजन व संगीताचे कार्यक्रम हे आयोजीत केलेले असतात.

या महोत्सवात प्रतिपदेपासूनच यात्रा भरण्यास सुरुवात होते.संपूर्ण परिसरात निरनिराळी दुकाने त्यात प्रसाद मिठाई,हळद कुंकू,पानफुले,बांगडया,खेळणी यांची दुकाने विशेषत्वाने असतात. या देवीच्या महोत्सवात राजगि-याच्या तळलेल्या कांडयावर साखरेचा पाक लावून तयार केलेले शिंगाडे याचा प्रसाद देवीस विशेषत्वाने भक्ताद्वारा समर्पण केला जातो.या नऊ दिवसांच्या उत्सवात सप्तमीचा दिन हा विशेष दिन आहे.या दिवशी परिसरातील लोक देवीच्या दर्शनासाठी मिळेल त्या वाहनाने मत्स्योद्री पर्वतावर येतात.व मनोनवे देवीचे दर्शन घेतात.या दिवशी देवीच्या दर्शनासाठी दर्शनार्थीच्या लांब-लांब रांगा दिवसभर लागलेल्या असतात.सप्तमीचे दिवशी रात्री संस्थनतर्फ परिसरात शोभेचे दारुकाम केले जाते.हजारो भक्तगण हे शोभेचे दारुकाम पाहण्यासाठी उपस्थित असतात.

समारोपः

जालना जिल्ह्यातील धार्मिक पर्यटन स्थळे हे ऐतिहासिकदृष्ट्या अतिशय समृध्द आहेत. यातील राजुर गणपती व मत्स्योदरी देवी अंबड हे दोन धार्मिक पर्यटन स्थळे ही महत्वाची पर्यटन स्थळे आहेत. जालना जिल्ह्यात येणाऱ्या पर्यटकांपैकी सर्वात जास्त पर्यटक या पर्यटन स्थळास भेट देतात.

Asst. Prof.
M.E.S.Class -I
Govt.College of Art's
Science A'bad



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Scanned with OKEN Scanner